मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शिवतारे यांनी अजित पवारांची माफी मागावी

## अन्यथा शिवसेनेच्या उमेदवाराचे काम आम्ही करणार नाही

**। पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शिंदे गटाचे माजी मंत्री विजय शिवतारे वारंवार उपमुख्यमंत्री अजित पवारांवर बरसत आहेत. पण आता शिवतारेंना समज द्या, अजितदादांची माफी मागायला लावा. अन्यथा मावळ लोकसभेत शिंदे गटाकडून दिल्या जाणाऱ्या उमेदवाराचे काम पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस करणार नाही असा इशारा अजित पवार गटाने पत्रकार परिषद घेऊन दिला आहे. या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, महिला अध्यक्षा कविता आल्हाट, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, नाना काटे, मोरेश्वर भोंडवे, फजल शेख आदी उपस्थित होते.



अजित गव्हाणे म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुतीमध्ये आहे. महायुती म्हणून लोकसभा निवडणुकीला एकत्रित सामोरे जायचे आहे. महाराष्ट्रातून महायुतीच्या ४५ जागा निवडून आणण्यासाठी काम करत आहोत. परंतु, बारामतीमध्ये पुरंदरचे माजी आमदार विजय शिवतारे यांच्या विधानामुळे आम्ही नाराज आहोत. कार्यकर्ते संतप्त आहेत. आमच्या नेत्यांबाबत अतिशय चुकीची विधाने त्यांच्याकडून केली जात आहेत. त्यांच्या विधानामुळे महायुतीला तडा जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा मावळच्या जागेवर दावा आहे. परंतु, महायुतीत ही जागा शिवसेनेला सुटली आणि शिवतारे यांची अशीच भूमिका राहिली. तर, मावळमध्ये शिवसेनेच्या उमेदवाराच्या विरोधात भूमिका घेणार आहोत. शिवतारे यांनी अजित पवार यांची माफी मागावी. जोपर्यंत माफी मागत नाहीत. तोपर्यंत आम्ही मावळमध्ये शिवसेनेच्या उमेदवाराचा प्रचार करणार नाहीत. राज्यभरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्तेही अशीच भूमिका घेतील. शिवतारे यांनी माफी मागितल्यास मावळमध्ये युतीचा धर्म पाळला जाईल. बारामती लोकसभा मतदारसंघातील जनता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत आहे. त्यांनी बारामतीत मोठी विकास कामे केली आहेत. त्यामुळे बारामतीत आमचा उमेदवार निवडून येईल, याची आम्हाला खात्री आहे, असेही ते म्हणाले. गव्हाणे म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुतीमध्ये आहे. महायुती म्हणून लोकसभा निवडणुकीला एकत्रित सामोरे जायचे आहे. महाराष्ट्रातून महायुतीच्या ४५ जागा निवडून आणण्यासाठी काम करत आहोत. परंतु, बारामतीमध्ये पुरंदरचे माजी आमदार विजय शिवतारे यांच्या विधानामुळे आम्ही नाराज आहोत. कार्यकर्ते संतप्त आहेत.

# पुन्हा असा प्रकार घडल्यास गाठ मनसेशी

## मनसेचा जयहिंद हायस्कूल प्रशासनाला इशारा..!

**। पिंपरी-चिंचवड।**

पिंपरी चिंचवड शहरातील जयहिंद हायस्कूलमध्ये मुले व मुलींच्या स्वच्छतागृहामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. दरम्यान मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी पदाधिकाऱ्यांसमवेत शाळेची पाहणी केली व शाळा प्रशासनाला 'पुन्हा असा प्रकार घडल्यास तर गाठ मनसेशी राहील, असा इशारा दिला. यावेळी शाळा प्रशासनाने सीसीटीव्ही कॅमेरे हटविण्यात आले असल्याची माहिती दिली.याबाबत सविस्तर वृत्त असे की, पिंपरी चिंचवड शहरातील जयहिंद हायस्कूलमधील स्वच्छतागृहामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावले असल्याचा व्हिडिओ सामाज माध्यमांवर व्हायरल झाला होता. त्यानंतर विविध माध्यमातून याबाबत तीव्र आक्षेप घेण्यात आले. तर पालकांनीही याला विरोध केला होता. याबाबत विचारणा करण्यासाठी मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले, महिला शहराध्यक्ष सीमा बेलापूरकर, नितीन चव्हाण, मनोज लांडगे, तुषार सोनटक्के, अंकित शिंदे, अक्षय देसले, देवेंद्र निकम, शंकर तरपडे व पदाधिकाऱ्यांनी शाळेला भेट दिली. संपूर्ण शाळेची पाहणी केल्यानंतर स्वच्छतागृहामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावल्यामुळे मुलांच्या गोपनीयतेचा भंग होत असल्याचा आरोप करत मनसे पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त केला.

दरम्यान, 'शाळेत पुन्हा असा प्रकार घडल्यास तर गाठ मनसेशी राहील, असा इशारा देण्यात आला. यावेळी मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले म्हणाले की, शाळेत असे प्रकार घडणे अत्यंत संतापजनक आहे. शिक्षणाचे माहेर घर म्हणून लौकिक मिळविलेल्या पुण्यात असे प्रकार सहन केले जाणार नाहीत. शहरात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी वर्गासाठी मनसे सदैव तत्पर आहे. शिक्षण विभागाने या गैर प्रकाराची तात्काळ दखल घेत कारवाई करावी,अशी मागणी सचिन चिखले यांनी केली.पिंपरी चिंचवड शहरातील जयहिंद हायस्कूलमधील स्वच्छतागृहामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर पिंपरी महापालिकेच्या शिक्षण विभागालाही खडबडून जाग आली. प्रशासनाने शाळेत जात तेथील कॅमेरे हटवले आहेत. तसेच शाळेला याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

# महाराष्ट्रातील विणकर समाज आर्थिक विकास महामंडळास शासनाची मंजूरी

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी मानले सरकारचे आभार



**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यातील महायुती सरकारने विणकर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व आर्थिक उन्नतीकरीता स्वतंत्र विणकर समाज आर्थिक विकास महामंडळाला मंजूरी दिली असून, सदरचे महामंडळ महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत स्थापना करण्याबाबतचा शासन निर्णय दि.१६ मार्च रोजी जारी करण्यात आला आहे. या निर्णयाबाबत पिंपरी चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात रहिवासी असलेल्या विणकर समाजातील युवकांना वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या धर्तीवर विविध योजनांचा (बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना) लाभ मिळावा, यासाठी दि. १६ मार्च रोजी महामंडळ स्थापन करण्याचा शासन निर्णय जारी करून, या समाजाला न्याय देण्याचे काम केले आहे. महाराष्ट्र विणकर समाज संयुक्त कृती समिती महामंडळ मंजूर करून स्वतंत्र असे विणकर समाज महामंडळाची घोषणा राज्यातील महायुती सरकारने केली आहे, असे शंकर जगताप यांनी सांगितले. राज्यात विणकर समाजाची एकजूट दाखविण्यासाठी एकच संघटना असावी, यासाठी सर्व विणकर बांधव, जाती पोटजातींनी एकत्र येवून लढा देण्यासाठी ९ एप्रिल २०२३ रोजी संयुक्त कृती समितीची स्थापना केली. सर्व पोटजातींना प्रतिनिधित्व देवून सुकाणू समिती निर्माण केली. सर्वानुमते एक सामाईक निवेदन तयार करून मुख्यमंत्री यांच्याकडे पोहोचविण्यात आले. मंत्रालयात वेळोवेळी बैठका पार पडल्या. मुख्यमंत्री महोदयांसोबत विणकर प्रतिनिधींची चर्चा देखील झाली. अखेर, १६ मार्च २०२४ रोजी विणकर महामंडळास राज्य शासनाकडून अंतिम मान्यता देण्यात आली. संयुक्त कृती समितीचे संयोजक तथा पदाधिकारी, कार्यकर्ते मागण्या संदर्भात न्याय मिळाला, म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी विशेष प्रयत्न केले. विणकर समाजाचे संयोजक सुरेश तावरे, दत्ताभाऊ ढगे, अरुण वरोडे, तसेच अनेक महाराष्ट्रातील मान्यवरांनी मोलाचे सहकार्य लाभले.शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, राज्यातील विणकर समाजांतर्गत येणा-या सर्व पोटजातींच्या सामाजिक व आर्थिक उन्नती व्हावी, यासाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या धर्तीवर विणकर समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

# खान्देश मराठा पाटील समाज संघाचा ५ वर्धापनदिन उत्साहात

## उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन सत्कार

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अहिराणी गितांचा सूर आणि धम्माल मस्ती कार्यक्रमांनी खान्देश मराठा पाटील समाज संघाचा पाचवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आकुर्डी खंडोबामाळ, सभागृह येथे नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उपायुक्त निलेश भदाणे होते. प्रमुख पाहुणे खासदार श्रीरंग आप्पा बारणे, माजी सभागृह नेते नामदेव ढाके, माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, माजी गटनेते राहुल कलाटे, नगरसेवक भाऊसाहेब भोईर, नारायण बहिरवाडे, शारदा सोनवणे, शेखर चिंचवडे, राजेंद्र साळुंखे, पाटील बुवा चिंचवडे, दै. सकाळच्या संपादिका शितल पवार, उद्योजक दीपक पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये, निलेश शशिकांत भदाणे यांना समाज भूषण पुरस्कार देवून गौरविण्यात आले. तसेच, भिला पाटील (सामाजिक कार्यगौरव पुरस्कार), रवींद्र सूर्यवंशी (उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कार), प्रवीण भामरे (खांदेश रत्न पुरस्कार), गिरीश साळुंखे (युवा उद्योजक पुरस्कार), किशोर पाटील (खान्देश गौरव पुरस्कार), जितेंद्र शिंदे (समाजसेवा पुरस्कार), चेतन साळुंखे (उद्योग रत्न पुरस्कार), महेश पाटील (खान्देश गौरव पुरस्कार), ॲड. विश्वासराव पाटील (सामाजिक न्यायभूषण पुरस्कार), संदीप शिसोदे (उद्योग रत्न पुरस्कार), डॉ. सोनाली पाटील (शिक्षण रत्न पुरस्कार), वर्षा सोनवणे (महिला उद्योजक पुरस्कार), मयूर पाटील (वास्तुविशारद हिरोजी इंदुलकर पुरस्कार) देवून सन्मानित करण्यात आले. उपायुक्त निलेश भदाणे यांनी खानदेशातील विविध चालीरिती, युवकांना स्पर्धा परीक्षेच्या सरावाबद्दल मार्गदर्शन केले. जगाच्या पाठीवर कुठे जा पण आपली मातृभूमी, मायबोलीचा विसर पडू देऊ नका, असे सांगितले. खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी मनोगत व्यक्त केले. पिंपरी चिंचवड शहराच्या जडण घडणी मध्ये खान्देशवासी बांधवांचा मोलाचा वाटा असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके यांनी आपल्या भाषणात समाजामार्फत सुरू असलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. खान्देश मराठा पाटील समाज संघाच्या सामाजिक उपक्रमाबद्दल मोरेश्वर भोंडवे, भाऊसाहेब भोईर, राहुल कलाटे यांनी शुभेच्छा दिल्या. खान्देश मराठा पाटील समाज संघाचे अध्यक्ष महेंद्र पाटील यांनी प्रास्ताविक केले.

# ज्या दिवशी मी रिंगणात उतरेन

## आजपासून निवडणुकीला ५५ दिवस आहेत : वसंत मोरे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** काही दिवसांपूर्वीच पुण्यात वसंत मोरे यांनी मनसेला रामराम ठोकल्यामुळे मोठी राजकीय चर्चा झाल्याचं पाहायला मिळालं. वसंत मोरे यांनी पुण्यातील मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांवर टीका करत पक्षातून बाहेर पडत असल्याचं जाहीर केलं. त्यामुळे मनसेच्या पुण्यातील संघटनेमध्ये सारंकाही आलबेल नसल्याचं दिसून आलं. मात्र, त्यापाठोपाठ आता वसंत मोरेंची पुढची राजकीय वाटचाल कशी असेल? यावर तर्क-वितर्कांना उधाण आलं होतं. यासंदर्भात वसंत मोरेंनी आज माध्यमांशी बोलताना सूचक विधान केलं आहे.वसंत मोरे यांनी यावेळी त्यांच्या राजकीय भविष्याबाबत अद्याप निर्णय झाला नसल्याचं सांगितलं. पुढील राजकीय वाटचालीसंदर्भात आम्ही लोकांकडून मत जाणून घेतोय. लोक बऱ्याचदा काही पर्याय सुचवतात. पण ते निवडताना पुण्याचं हित झालं पाहिजे त्या दृष्टीने पावलं टाकतोय, असं ते म्हणाले.मी मविआकडून उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्न करतोय. कारण इथे फक्त निवडणुका लढायच्या नाहीयेत तर जिंकायच्याही आहेत. त्यामुळे जिंकण्यासाठी लढायचं असेल तर योग्य ट्रॅकवर असणं गरजेचं आहे. मी योग्य ट्रॅकवरच असून त्यात यशस्वी होईन असं मला वाटतं, असं वसंत मोरेंनी नमूद केलं.दरम्यान, पुणे लोकसभा मतदारसंघाची निवडणूक एकतर्फी होईल, यावर वसंत मोरेंनी यावेळी विश्वास व्यक्त केला. आजपासून निवडणुकीला ५५ दिवस आहेत. त्यामुळे कमी दिवस वगैरे काही नाही. ज्या दिवशी वसंत मोरे रिंगणात उतरेल, त्या दिवशी पुणे लोकसभेच्या निवडणुकीत खऱ्या अर्थाने रंगत येईल. तेव्हा आपण निवडणूक कशी एकतर्फी होईल हे पाहू, असं ते म्हणाले. तसेच, दुसऱ्या पक्षात जाण्याआधीच पक्ष सोडल्याबाबत विचारलं असता माझी वेळ नक्कीच चुकलेली नाही. मी वेळ घेतोय. योग्य वेळी मी योग्य निर्णय घेईन, असं ते म्हणाले.यावेळी बोलताना वसंत मोरेंनी भाजपा नेते व पुण्यातील आमदार चंद्रकांत पाटील यांना टोला लगावला. वसंत मोरे अपक्ष म्हणून निवडणुकीला उभे राहिले, तर त्यानं आम्हाला फारसा फरक पडणार नाही, असं विधान चंद्रकांत पाटलांनी केल्याबाबत विचारणा केली असता वसंत मोरेंनी त्यावर खोचक टिप्पणी केली. तसा फरक पडला नसता तर २०२२ ला ते मला म्हणालेच नसते की तुम्ही भाजपात या. मॅरिएट हॉटेलमध्ये मला सकाळ समूहांनं पुरस्कार दिला होता.



**» तेव्हा उघडपणे चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं होतं की तुम्ही भाजपात या, तुम्ही निवडून याल. मी तेव्हाच त्यांना सांगितलं की माझ्या तिन्ही टर्म भाजपाविरोधात झाल्या आहेत आणि तिन्ही वेळा मी यशस्वी झालो आहे. त्यामुळे माझ्या उमेदवारीनं काय फरक पडेल हे पुणेकर त्यांना दाखवेल, असं अप्रत्यक्ष आव्हानच त्यांनी चंद्रकांत पाटील यांना दिलं.मात्र, त्यापाठोपाठ आता वसंत मोरेंची पुढची राजकीय वाटचाल कशी असेल? यावर तर्क-वितर्कांना उधाण आलं होतं. यासंदर्भात वसंत मोरेंनी आज माध्यमांशी बोलताना सूचक विधान केलं आहे.वसंत मोरे यांनी यावेळी त्यांच्या राजकीय भविष्याबाबत अद्याप निर्णय झाला नसल्याचं सांगितलं. पुढील राजकीय वाटचालीसंदर्भात आम्ही लोकांकडून मत जाणून घेतोय. लोक बऱ्याचदा काही पर्याय सुचवतात. पण ते निवडताना पुण्याचं हित झालं पाहिजे त्या दृष्टीने पावलं टाकतोय, असं ते म्हणाले.मी मविआकडून उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्न करतोय. कारण इथे फक्त निवडणुका लढायच्या नाहीयेत तर जिंकायच्याही आहेत. त्यामुळे जिंकण्यासाठी लढायचं असेल तर योग्य ट्रॅकवर असणं गरजेचं आहे.**

# आपल्या माणसांसमोर मन मोकळे करायचे नाही का?

## श्रीनिवास यांच्या वक्तव्यासंदर्भात सुप्रिया सुळे यांचा सवाल

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** आपल्या माणसांसमोर मन मोकळे करायचे नाही का? इतकाही अधिकार या देशात राहिला नाही का?, असे सवाल उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास पवार यांनी केलेल्या वक्तव्यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केले. काटेवाडी येथील कार्यक्रमात गावकऱ्यांशी संवाद साधताना श्रीनिवास पाटील यांनी केलेले भाषण ही अजित पवार यांच्यावर केलेली टीका असल्याची चर्चा राजकीय वर्तुळामध्ये सुरू झाली. त्यासंदर्भात बारामतीमध्ये बोलताना सुप्रिया सुळे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.श्रीनिवास पवार आणि शर्मिला पवार हे कायमच माझा प्रचार करत आले आहेत. त्यांनी अजित पवार यांच्यावर टीका केली असे मला वाटत नाही. काटेवाडी हे श्रीनिवास पवार यांचे गाव आहे. त्यांच्या मित्रपरिवारासमोर त्यांनी मन मोकळ केले इतकेच आहे. एखाद्या माणसाने आपल्या घरात, आपल्या माणसांसमोर मन मोकळे करायचे नाही का? इतकाही अधिकार या देशात राहिलेला नाही का, असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला. बारामतीमध्ये शरद पवार यांना हरविणे हे एकच लक्ष्य असल्याचे विधान उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले होते. त्याचा समाचार घेताना विकासाचे मुद्दे, दुष्काळाची परिस्थिती, महागाई, बेरोजगारी, टँकर, पिकांना हमीभाव असा मुद्दे न घेता केवळ शरद पवार यांना हरविण्याचे ध्येय ठेवणे हे दुर्दैवी आहे, अशी प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.हा सुसंस्कृत महाराष्ट्र आहे. वैचारिक लढाई आहे. ज्या पद्धतीने संपविण्याची भाषा, धमक्या देतात ही भाषा राज्याला शोभत नाही. जे मनात आहे ते त्यांच्या ओठावर आले. सूडाचे आणि गलिच्छ राजकारण ते करतात. विकासाचा मुद्दा त्यांच्यासाठी महत्वाचा नाही हे समोर आले, अशी टिप्पणी सुळे यांनी बारामतीमध्ये बोलताना केली.त्यासंदर्भात बारामतीमध्ये बोलताना सुप्रिया सुळे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.श्रीनिवास पवार आणि शर्मिला पवार हे कायमच माझा प्रचार करत आले आहेत. त्यांनी अजित पवार यांच्यावर टीका केली असे मला वाटत नाही. काटेवाडी हे श्रीनिवास पवार यांचे गाव आहे.





# कायदेशीर भूमिकेचे पालन करणे आवश्यक

## सध्या जग इतिहासाच्या एका महत्त्वाच्या मार्गावर उभे :अनिल चौहान

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** देशाच्या विवादित सीमा आणि चीनचा उदय हे देशापुढील, लष्करापुढील मोठे आव्हान आहे. त्यामुळे शांततेच्या काळात विवादित सीमांबाबत सशस्त्र दलांनी भारताच्या कायदेशीर भूमिकेचे पालन करणे आवश्यक आहे, असे मत सरसेनाध्यक्ष अनिल चौहान यांनी सोमवारी मांडले. सध्याच्या भूराजकीय अनिश्चिततेचे सामरिक आणि रणनीती अशा दोन्ही दृष्टीकोनातून पुनर्मूल्यमापन करण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात केवळ भारतापुढेच नाही, तर जगापुढे सर्वांत मोठे आव्हान असल्याचेही त्यांनी नमूद केले.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संरक्षण आणि सामारिकशास्त्र विभाग, सेंटर फॉर चायना




ॲनालिसिस अँड स्ट्रॅटेजी, सेंटर फॉर अडवान्स्ड स्ट्रॅटेजिक स्टडीज यांच्यातर्फे 'चीनचा उदय आणि त्याचे जगावरील परिणाम' या विषयावरील परिषदेच्या उद्घाटनावेळी चौहान बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रकुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव आणि संरक्षण सामरिक शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे, एअर मार्शल (नि.) भूषण गोखले, सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक स्टडीजचे प्रमुख जयदेव रानडे या वेळी उपस्थित होते.चौहान म्हणाले, की नवीन तथ्ये, आक्रमकतेच्या माध्यमातून विरोधक विवादित सीमांबाबत नवीन कथन तयार करण्याचा प्रयत्न करू शकतात. त्याविरोधात सर्वांनी मिळून काम केले पाहिजे. त्यात शिक्षणतज्ज्ञ, रणनीतीकार, विचारवंत, विद्यार्थी अशा सर्वांचा सहभाग गरजेचा आहे. अभ्यासक, उद्योग नेते, अधिकारी, धोरणकर्ते यांनी चीनकडे लक्ष दिले पाहिजे. कारण चीनच्या महत्त्वाकांक्षा आणि उणिवा भविष्यातील आंतरराष्ट्रीय वातावरणाचे स्वरुप तयार करतात. सध्या जग इतिहासाच्या एका महत्त्वाच्या मार्गावर उभे आहे.

तिथे जागतिक शक्तीच्या गतिशीलतेमध्ये महत्त्वपूर्ण बदल होत आहेत. चीनच्या लष्करी क्षमतांचा होत असलेला विस्तार आणि वाढत्या सामरिक महत्त्वाकांक्षा खोलवर विचार करायला लावतात. विरोधी राष्ट्र आणि भारत यांच्यातील तंत्रज्ञानातील दरी परवडणारी नाही. अशी दरी निर्माण होणे घातक ठरू शकते. ही तंत्रज्ञानाची दरी कमी करण्यासाठी सैनिकांसह शिक्षणतज्ज्ञ, शास्त्रज्ञ अशा सर्वांनी एकत्रितपणे देश म्हणून लढण्याची गरज आहे. शेजारच्या राष्ट्रांतील राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अस्थिरतेमुळे देशापुढे सुरक्षिततेचे आव्हान आहे. स्थिर सरकारी संरचना आणि परिणामकारक अंमलबजावणी यंत्रणेच्या अभावामुळे गुन्हेगारी, अमली पदार्थ, मानवी व्यापार, शस्त्रांचा व्यापार असे प्रकार वाढू शकतात. त्यामुळे प्रादेशिक सुरक्षिततेसह सुरक्षिततेचे वातावरण अस्थिर होते, असे चौहान म्हणाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संरक्षण आणि सामारिकशास्त्र विभाग, सेंटर फॉर चायना ॲनालिसिस अँड स्ट्रॅटेजी, सेंटर फॉर अडवान्स्ड स्ट्रॅटेजिक स्टडीज यांच्यातर्फे 'चीनचा उदय आणि त्याचे जगावरील परिणाम' या विषयावरील परिषदेच्या उद्घाटनावेळी चौहान बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रकुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव आणि संरक्षण सामरिक शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे, एअर मार्शल (नि.) भूषण गोखले, सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक स्टडीजचे प्रमुख जयदेव रानडे या वेळी उपस्थित होते.चौहान म्हणाले, की नवीन तथ्ये, आक्रमकतेच्या माध्यमातून विरोधक विवादित सीमांबाबत नवीन कथन तयार करण्याचा प्रयत्न करू शकतात.

# मेफेड्रोन तस्करी प्रकरणात दिल्लीतील गोदामात छापे

## १६ लाख ४३ हजार रुपये किंमतीचे ८२ ग्रॅम १५० मिलिग्रॅम मेफेड्रोन जप्त

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मेफेड्रोन तस्करी प्रकरणात गुन्हे शाखेने पुणे आणि दिल्लीतील गोदामात छापे टाकले. मेफेड्रोन तयार करण्यासाठी कच्चा माल पुरविणारा आरोपी पप्पू कुरेशी याने भाडेतत्वावर घेतलेल्या गोदामातून १६ लाख ४३ हजार रुपये किंमतीचे ८२ ग्रॅम १५० मिलिग्रॅम मेफेड्रोन (एमडी) पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने जप्त केले.मेफेड्रोन तस्करी प्रकरणात पसार झालेला आरोपी मोहम्मद उर्फ पप्पू कुतूब कुरेशी (रा. केसनंद) याला कर्नाटकातील यादगीर भागातून नुकतीच अटक करण्यात आली. कुरेशीने साथीदार हैदर शेख, अशोक मंडल, संदीप धुनिया आणि शोएब शेख यांच्याशी संगमनत करून पुणे आणि दिल्लीतील गोदामात मेफेड्रोन ठेवले होते. याबाबतची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने दिल्ली आणि पुणे परिसरातील गोदामात छापे




टाकून १६ लाख ४३ हजार रुपये किंमतीचे ८२ ग्रॅम १५० मिलिग्रॅम मेफेड्रोन जप्त केले.कुरेशी याच्या पोलीस कोठडीची मुदत मंगळवारी संपली. त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. कुरेशीने अमली पदार्थांचा साठा अन्य ठिकाणी ठेवला का? यादृष्टीने तपास करायचा आहे. कुरेशी कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील कारखान्यात मेफेड्रोन तयार करण्यासाठी कच्चा माल पुरवित होता. त्याच्याकडे सांगली आणि दिल्लीत मेफेड्रोन वितरित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती, असे सरकारी वकील ॲड. नीलीमा इथापे-यादव यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तपासासाठी पोलीस कोठडीत वाढ करण्याची विनंती त्यांनी केली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. सी. बिराजदार यांनी कुरेशीच्या पोलीस कोठडीत सहा दिवसांनी वाढ केली. दिल्लीतील गोदामात पोलिसांनी छापा टाकला. गोदामातील निळ्या रंगाच्या ड्रममध्ये मेफेड्रोन ठेवण्यात आले होते. निळे ड्रम दिल्लीत कसे पाठविले, कोणत्या वाहनाचा वापर केला? कुरेशी सराइत असून, त्याचे अमली पदार्थ विक्री करणाऱ्या तस्करांशी संबंध आहेत का? , यादृष्टीने तपास करायचा आहे. कुरेशी पसार झाल्यानंतर तो कोणाकडे वास्तव्यास होता. या काळात त्याने कोणाला अमली पदार्थांची विक्री केली का?, यादृष्टीने तपास करायचा असल्याचे सरकारी वकिलांनी सांगितले.